ISBN No. : 978-81-926341-6-6


"ज्ञान विज्ञान आणि सुसंस्कार या साठी शिक्षण प्रसार"



इचलकरंजी



# MANCHESTER : A RESEARCH JOURNAL
## (THE MULTI DISCIPLINARY ISSUE)



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
**Dattajirao Kadam Arts, Science & Commerce College**

Website: www.dkasc.com
Email: dkasccollege@gmail.com

# INDEX


| Sr. No. | Title of the paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Synthesis And Characterization Of Cu-doped ZnO Thin Films By Sol-Gel Method | Amol R. Nimbalkar, Maruti G. Patil | 1 |
| 2 | $NO_2$ Gas Sensing Properties of ZnO Thin Film Prepared By Sol-gel Method | Nilam B. Patil, Maruti G. Patil | 7 |
| 3 | Natural Dye From Clitoria ternatea (Gokarna) Flowers For Dyeing Cotton Fabrics. | S.R. More, Dr. S. S. Ankushrao, Dr. A. S. Tapase, Dr. C. R. Patil, D. P. Patil, D. B. Patil | 13 |
| 4 | Addition of Macrofungi To Fungi of India, From Kolhapur District | C. R. Patil, M. R Bhise, J. C Patil , S. C.Patil | 16 |
| 5 | A Study of Socioeconomic Status And Health Risks Among Sericulture Industry Workers, Maharashtra, India | R. A. Sanadi, A.D. Jadhav | 23 |
| 6 | Zika virus: a short review | Nilofar Shaikh, Rajendra Jagdale | 32 |
| 7 | Ergonomic Assessment of Cashewnut Kernel Peeling Activity in Women Workers Using REBA | Sachin S.Shinde, A. M. Qureshi, Dr. Asmita S. Tapase | 40 |
| 8 | Application's of SAP System in Mechanical Industry | Miss S.J. Gath | 44 |
| 9 | Digital India | Dr. Mrs. Varsha Raghunath Shinde | 52 |
| 10 | Deconstructing Social Exclusion for Reconstruction of Development | Ms. Shailaja A. Changundi | 57 |
| 11 | The Speaking Silence of the Woman in the Poems of Nandini Sahu | Ms. Shailaja A. Changundi | 62 |
| 12 | The Study of Consumerism as Human Rights : A Legal Analysis | Dr. D.G. Ghodake | 66 |
| 13 | Married Life in the Select Short Stories of Chitra Banerjee Divakaruni | Dr. S. I. Noorani | 70 |
| 14 | The Immigrant Married Life in the Select Short Stories of Bharati Mukherjee | Dr. S. I. Noorani | 76 |
| 15 | Pedagogy of Teaching Grammar: Hamlet Dilemma | Mrs. Sunita J. Velhal, | 80 |
| 16 | Human Resource Development In Sindhudurg District, Maharashtra. | Govardhan S. Ubale, Gavit S.S., Koli V.P., Sondge S.S. | 85 |
| 17 | नंदुरबार जिल्ह्यातील शेती व्यवसायात जलसिंचनाचे महत्व | प्रा. एस. एस. गावीत | 90 |
| 18 | कृष्णात खोत यांच्या साहित्यातील कोल्हापुरी बोली | डॉ.एकनाथ आळवेकर | 94 |
| 19 | रानकोंबडी कथासंग्रहातील सामजिकता | प्रा. डॉ. सुभाष गणपती जाधव | 98 |
| 20 | आदिवासी लोककथांमधील वैश्विक मिथके | प्रा. डॉ. दीपककुमार वळवी | 102 |
| 21 | हिंदी भाषा और इंटरनेट : दशा और दिशा | डॉ. दीपक रामा तुपे | 106 |
| 22 | रत्नकुमार सांभरिया के कहानी साहित्य में नारी विमर्श | प्रा. शहाजी जाधव | 111 |

# कृष्णात खोत यांच्या साहित्यातील कोल्हापुरी बोली

डॉ.एकनाथ आळवेकर
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी।
ई–मेल : eknathalvekar@gmail.com
भ्रमणध्वनी : ९४२३२८३७०३

**गोषवारा:**
साठोत्तरी मराठी साहित्यात बोलींचा वापर वाढला आहे. कोल्हापुरी, पुणेरी, चंदगडी, मराठवाडी, सातारी या मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. बोलीमधील सूक्ष्म असे प्रादेशिक भेद आणि हेतू या गोष्टी बोलीच्या अभ्यासातून ध्यनात येतात. कृणात खोत हे कोल्हापूर जिल्यातील महत्वाचे ग्रामीण लेखक असून त्यांच्या 'रौंदाळा', 'झडझिंबड', 'गावठाण', 'धूळमाती' या चारही कादंबऱ्यांतून कोल्हापूर आणि पन्हाळा परिसराच्या बोलीची वैशिष्ट्ये जाणवतात.

## प्रस्तावना :

साठोत्तरी मराठी साहित्यात प्रमाणभाषेबरोबर बोलींचा वापर होऊ लागला. साहित्यातील जीवनदर्शनाच्या सखोलतेचे मूल्यमापन करताना बोलीच्या वापराची अर्थपूर्णता विचारात घेता येते.महाराष्ट्रातील बोलीचा विचार करता मराठी या नावाखाली येणाऱ्या व त्यांच्या प्रादेशिक नावावरुन ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, देशी, कोकणी या सर्वमान्य बोली आहेत. याशिवाय कोल्हापुरी, पुणेरी, चंदगडी, मराठवाडी, सातारी या सुध्दा मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. पुणेरी, सातारी, कोल्हापुरी या भेदांना आपण बोलींचे स्थानिक भेद म्हणतो. बोलीची व्याख्या करताना विजया चिटणीस–माडगुळकर म्हणतात, "बोली म्हणजे परभाषकांना जवळजवळ पूर्णपणे कमीअधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना पूर्णपणे एकरुप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय."[1] बोली म्हणजे एका निश्चित भूभागात बोलले जाणारे भाषेचे स्वरुप होय. उच्चारण, व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार याबाबत बोलीला स्वतंत्र अस्तित्व असते. ग्रामीण कथा, कादंबरीचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीवर आधारित असतो. यासंबंधी वासुदेव मुलाटे म्हणतात, "बोलीच्या वापरातून अनुभव अधिक परिणामकारकतेने प्रकट होऊ शकतो. खेडयातील माणूस जी बोली बोलतो त्या बोलीतूनच त्याचे अंतरंग अधिक परिणामकारकतेने व्यक्त होत असते. तसेच त्या समाजाचे समाजमानस त्याच्या बोलीतून व्यक्त होत असते."[2] बोलीमधील सूक्ष्म असे प्रादेशिक भेद आणि हेतू या गोष्टी बोलीच्या अभ्यासातून ध्यानात येतात. साहित्यकृतीतून व्यक्ती आणि समाजमन यांची बोलीशी जुळलेली नाळ लक्षात येते. लेखक ज्या परिसरात राहतो, त्या परिसरातील बोली लेखकाला चिकटलेली असते. त्यामुळेच लेखकाला बोलीच्या वापरातून आपले अनुभव अधिक परिणामकारकतेने मांडता येतात. बोली ही त्या खेडयातील संस्कृतीचे दर्शन घडविते. कोल्हापूर परिसरातील महत्त्वाच्या ग्रामीण साहित्यिकांमध्ये आनंद यादव, शंकर पाटील, सखा कलाल, चंद्रकुमार नलगे, राजन गवस, कृष्णात खोत, किरण गुरव यांनी कोल्हापुरी बोलीचा वापर आपल्या लेखनात केला आहे. त्या त्या परिसरातील कोल्हापुरी बोलीचे वेगळेपण त्यांच्या कलाकृतीतून दिसून येते.

## कृष्णात खोत यांच्या साहित्यातील बोली:

कृष्णात खोत हे महाराष्ट्रातीलमहत्त्वाचे ग्रामीणसाहित्यिक असून 'गावठाण' (2001) 'रौंदाळा' (2008) 'झडझिंबड' (2012) 'धूळमाती' (2014) या चार ग्रामीण कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. या कादंबऱ्यातील परिसर हा पन्हाळा तालुक्यातील आहे. त्यामुळे कोल्हापूर आणि पन्हाळापरिसराच्या बोलीची वैशिष्ट्ये कादंबऱ्यातून येतात. तिथली उच्चारण व्यवस्था, म्हणी, वाक्प्रचार, प्रथा, परंपरा यांच्या संदर्भाने येणारे शब्द, कृषीसंस्कृती, नात्यांची ओळख या सर्व गोष्टी बोलीच्या अभ्यासातून जाणवतात.

## कोल्हापुरी बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द :

कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातून आलेले वैशिष्ट्यपूर्ण असे बोलीतील शब्द पुढीलप्रमाणे आहेत. आवुत–बैलांचे औत, आगाव –अचाट, धाडस, आडदानी–कपडे टाकण्यासाठी बांधलेला बांबू, इजडवाद – वितंडवाद, इनारत–फुकट जाणे, वाया जाणे, ईदमान –त्याशिवाय, इसान – थंड पाणी, कडान – मटणाचा रस्सा, कंचयाक – काहीतरी, खर्च – स्वयंपाकासाठी लागणाऱ्या तांदूळ, पीठ, डाळ इ.वस्तू, खांडकुळी – वेलवर्गिय तण, खुरुट – मळणीसाठी खळ तयार करताना खळयावरील तण काढणे, गदळणे – गद्धळ करणे, गोम – आतली गोष्ट, गुंडगुळ – वाटोळ, नुकसान, गंगुतार – शेतातील एक प्रकारचे तण, गुतपाळणे – गुंतणे, चांदी – घराची भिंत, चिवा – लांब बांबू, जोडगण – जोडीदारीन, झळंबल –झपाटलं, निरदळणे – निवळणे, न्योम – भरवसा, न्याती – नियत, ठायिक – ठिकाण, नक्की, खात्री, तरबत्तर – चिडणे, भांडणे, त्र्यार – थेर, दुचमाटणे – चाचपडणे, दूम– अंदाज, धांदुटी –शेताचा अरुंद तुकडा, पारुश्या तोंडाने – सकाळी झोपेतून उठल्यानंतर चूळ न भरता, अंघोळ न करताची अवस्था, ध्याडनीन – स्त्रियांच्या तोंडी असलेला हा शब्द, स्वतला दोष देताना हा शब्द वापरतात, पंद – संमिश्र तण, पिंजर – भाताची मळणी केल्यानंतर उरलेला भाग, बयाजवार – शिस्तवार, व्यवस्थित, बुरंगाट– रिमझिम पाऊस, भगटल – सकाळ झाली, भाकरी पचली – तव्यावर टाकलेली भाकरी उलथण्यास योग्य होणे, रासारी – रात्रभर, रॅंड – घाण,

# कृष्णात खोत यांच्या साहित्यातील कोल्हापुरी बोली

डॉ.एकनाथ आळवेकर

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी।
ई–मेल : eknathalvekar@gmail.com
भ्रमणध्वनी : ९४२३२८३७०३

**गोषवारा:**

साठोत्तरी मराठी साहित्यात बोलींचा वापर वाढला आहे. कोल्हापुरी, पुणेरी, चंदगडी, मराठवाडी, सातारी या मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. बोलीमधील सूक्ष्म असे प्रादेशिक भेद आणि हेतू या गोष्टी बोलीच्या अभ्यासातून ध्यनात येतात. कृणात खोत हे कोल्हापूर जिल्यातील महत्वाचे ग्रामीण लेखक असून त्यांच्या 'रौंदाळा', 'झडझिंबड', 'गावठाण', 'धूळमाती' या चारही कादंबऱ्यांतून कोल्हापूर आणि पन्हाळा परिसराच्या बोलीची वैशिष्ट्ये जाणवतात.

**प्रस्तावना :**

साठोत्तरी मराठी साहित्यात प्रमाणभाषेबरोबर बोलींचा वापर होऊ लागला. साहित्यातील जीवनदर्शनाच्या सखोलतेचे मूल्यमापन करताना बोलीच्या वापराची अर्थपूर्णता विचारात घेता येते.महाराष्ट्रातील बोलीचा विचार करता मराठी या नावाखाली येणाऱ्या व त्यांच्या प्रादेशिक नावावरुन ओळखल्या जाणाऱ्या वऱ्हाडी, खानदेशी, देशी, कोकणी या सर्वमान्य बोली आहेत. याशिवाय कोल्हापुरी, पुणेरी, चंदगडी, मराठवाडी, सातारी या सुध्दा मराठीच्या बोलीभाषा म्हणता येतील. पुणेरी, सातारी, कोल्हापुरी या भेदांना आपण बोलींचे स्थानिक भेद म्हणतो. बोलीची व्याख्या करताना विजया चिटणीस–माडगुळकर म्हणतात, "बोली म्हणजे परभाषकांना जवळजवळ पूर्णपणे कमीअधिक प्रमाणात सारख्या वाटणाऱ्या तर तद्भाषकांना पूर्णपणे एकरुप वाटणाऱ्या व्यक्तीभाषकांचा समूह होय."[1] बोली म्हणजे एका निश्चित भूभागात बोलले जाणारे भाषेचे स्वरुप होय. उच्चारण, व्याकरण, म्हणी, वाक्प्रचार याबाबत बोलीला स्वतंत्र अस्तित्व असते. ग्रामीण कथा, कादंबरीचा सगळा जिवंतपणा तिच्या बोलीवर आधारित असतो. यासंबंधी वासुदेव मुलाटे म्हणतात, "बोलीच्या वापरातून अनुभव अधिक परिणामकारकतेने प्रकट होऊ शकतो. खेडयातील माणूस जी बोली बोलतो त्या बोलीतूनच त्याचे अंतरंग अधिक परिणामकारकतेने व्यक्त होत असते. तसेच त्या समाजाचे समाजमानस त्याच्या बोलीतून व्यक्त होत असते."[2] बोलीमधील सूक्ष्म असे प्रादेशिक भेद आणि हेतू या गोष्टी बोलीच्या अभ्यासातून ध्यानात येतात. साहित्यकृतीतून व्यक्ती आणि समाजमन यांची बोलीशी जुळलेली नाळ लक्षात येते. लेखक ज्या परिसरात राहतो, त्या परिसरातील बोली लेखकाला चिकटलेली असते. त्यामुळेच लेखकाला बोलीच्या वापरातून आपले अनुभव अधिक परिणामकारकतेने मांडता येतात. बोली ही त्या खेडयातील संस्कृतीचे दर्शन घडविते. कोल्हापूर परिसरातील महत्त्वाच्या ग्रामीण साहित्यिकांमध्ये आनंद यादव, शंकर पाटील, सखा कलाल, चंद्रकुमार नलगे, राजन गवस, कृष्णात खोत, किरण गुरव यांनी कोल्हापुरी बोलीचा वापर आपल्या लेखनात केला आहे. त्या त्या परिसरातील कोल्हापुरी बोलीचे वेगळेपण त्यांच्या कलाकृतीतून दिसून येते.

**कृष्णात खोत यांच्या साहित्यातील बोली:**

कृष्णात खोत हे महाराष्ट्रातीलमहत्त्वाचे ग्रामीणसाहित्यिक असून 'गावठाण' (2001) 'रौंदाळा' (2008) 'झडझिंबड' (2012) 'धूळमाती' (2014) या चार ग्रामीण कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. या कादंबऱ्यातील परिसर हा पन्हाळा तालुक्यातील आहे. त्यामुळे कोल्हापूर आणि पन्हाळापरिसराच्या बोलीची वैशिष्टये कादंबऱ्यातून येतात. तिथली उच्चारण व्यवस्था, म्हणी, वाक्प्रचार, प्रथा, परंपरा यांच्या संदर्भाने येणारे शब्द, कृषीसंस्कृती, नात्यांची ओळख या सर्व गोष्टी बोलीच्या अभ्यासातून जाणवतात.

**कोल्हापुरी बोलीतील काही वैशिष्ट्यपूर्ण शब्द :**

कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातून आलेले वैशिष्ट्यपूर्ण असे बोलीतील शब्द पुढीलप्रमाणे आहेत. आवुत–बैलांचे औत, आगाव –अचाट, धाडस, आडदानी–कपडे टाकण्यासाठी बांधलेला बांबू, इजडवाद – वितंडवाद, इनारत–फुकट जाणे, वाया जाणे, ईदमान –त्याशिवाय, इसान – थंड पाणी, कडान – मटणाचा रस्सा, कंचयाक – काहीतरी, खर्च – स्वयंपाकासाठी लागणाऱ्या तांदूळ, पीठ, डाळ इ.वस्तू, खांडकुळी – वेलवर्गीय तण, खुरुट – मळणीसाठी खळ तयार करताना खळयावरील तण काढणे, गदळणे – गढूळ करणे, गोम – आतली गोष्ट, गुंडगुळ – वाटोळ, नुकसान, गंगुतार – शेतातील एक प्रकारचे तण, गुतपाळणे – गुंतणे, चांदी – घराची भिंत, चिवा – लांब बांबू, जोडगण – जोडीदारीन, झळंबल –झपाटलं, निरदळणे – निवळणे, न्योम – भरवसा, न्याती – नियत, ठायिक – ठिकाण, नक्की, खात्री, तरबत्तर – चिडणे, भांडणे, त्र्यार – थेर, दुचमाटणे – चाचपडणे, दूम– अंदाज, धांदुटी –शेताचा अरुंद तुकडा, पारुश्या तोंडाने – सकाळी झोपेतून उठल्यानंतर चूळ न भरता, अंघोळ न करताची अवस्था, ध्वाडनीन – स्त्रियांच्या तोंडी असलेला हा शब्द, स्वतःला दोष देताना हा शब्द वापरतात, पंद – संमिश्र तण, पिंजर – भाताची मळणी केल्यानंतर उरलेला भाग, बयाजवार – शिस्तवार, व्यवस्थित, बुरंगाट– रिमझिम पाऊस, भगटल – सकाळ झाली, भाकरी पचली – तव्यावर टाकलेली भाकरी उलथण्यास योग्य होणे, रासारी – रात्रभर, रेंड – घाण,

रस – निखारे, लिंबड – लचांड, संकट, वटकान – आधार, वायल – चुलीचाच भाग, छोटे भांडे ठेवण्यासाठी वापरतात, वाढूळपातूर –वेळपर्यंत, व्हगडण – हरवण, वैवाट – वहिवाट, रितभात, व्हाईच – थोडस, जरास, व्हयकारनी – होकार, कबूल करणे, सपाराभा – नाहीसे होणे, सायलय – सहन केले, सांबार – शाकाहारी पातळ कालवण, हुटी – वळई, व्हळी (गवत, पिंजर यांचा रेखीव पध्दतीने रचलेला ढीग), हिंगलीत नाहीत – महत्व देत नाहीत, हयेंबल – अडाणी, कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातून आलेले हे बोलीभाषेतील शब्द कृषीक्षेत्र, स्वयंपाकघर, समाजव्यवहारातून आलेले आहेत इतर काही शब्द भावना व्यक्त करणारे आहेत.

**बोलीतील वाक्यव्यवस्था व अर्थ :**

बोलीभाषेतील एखादे वाक्य अथवा एखादा शब्द वाचनात आला तर त्याचा संदर्भाने अर्थ लावला जातो. बोलीचा तो परिसर सोडून इतर वाचकांना त्यातला नेमका अर्थ समजून घ्यायला अडथळा येतो. कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील काही वाक्यव्यवस्था व त्यांचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

1) 'वातीय गावलाय पावूस रोज जरा तरी लागायचाच. आता दसरा संपस्तवर' (गावठाण, पृ. 25)

या वाक्यातील 'गावलाय' म्हणजे सापडलाय तर 'वात' म्हणजे देवासमोरील दिव्यातील वात हा अर्थ आहे. दसरा सणाच्या पहिल्या दिवसापासून देवासमोर दिव्याची वात जळत ठेवतात. नवरात्रीतील पहिल्यादिवशी थोडा जरी पाऊस पडला तरी जाऊस वातीत सापडतो आणि मग दसरा संपेपर्यंत थोडा थोडा तरी लागतो अशी समजूत आहे.

2) 'त्या पाटा आणायच्या – दोन दोन येतानं अर्धलीनं दिल्याता.' ('गावठाण' , पृ. 100) या वाक्यात 'पाटा' आणि 'येतानं' आणि 'अर्धलीन' असे तीन बोलीतील शब्द आहेत. 'पाट' म्हणजे शेळीपासून जन्मलेले मादी जातीच पिल्लू. 'पाटा' हे अनेकवचन आहे. 'येतानं' मधील मुळ शब्द 'वेत'. गाय, म्हैस, शेळी यांच्या विण्याचा काळ म्हणजे 'वेत'. 'अर्धलीन' हा शब्द पहिल्या दोन शब्दांशी संबंधित असून तो संदर्भ अधिक स्पष्ट करणारा आहे. गाय, म्हैस, शेळी ही दुभती जनावर दुसऱ्या व्यक्तीला अर्धलीन देण हा व्यवहार असतो. ज्यांच्या घरात खूप दुभती जनावर आहेत किंवा ज्यांना जनावरे पोसण्याची ऐपत नसते असा शेतकरी ती जनावरे त्यांच्या पहिल्या विण्याच्या (वेताच्या) अगोदरच दोन–तीन वेताचे दुध–दुभते खाण्याच्या तोंडी करारावर इतरांना सांभाळायला दिली जातात. त्या व्यवहाराला 'अर्धलीन देणे' असेही म्हटले जाते.

3) 'चुलत्यानं धारचं कायच सांगितलं न्हाई' ('गावठाण', पृ. 44) या वाक्यातील 'धार' हा शब्द लग्नसंस्काराशी संबंधित असून 'धार घालणे' ही लग्नातील प्रथा आहे. मुलीच्या लग्नात तिच्या चुलत्याने अगर इतर नातलगाने धारची भांडी दान म्हणू दयायची असतात. श्रीकृष्णाची पितळी मूर्ती, देवपूजेची तांब्याची भांडी, याबरोबरच सांपत्तिक स्थितीनुसार तांब्याचा बंब, घागर अशा वस्तू धारेचा आहेर म्हणून दिल्या जातात.

वरील तीनही वाक्यातून येणारे संदर्भ हे ग्रामसंसकृती अधोरेखित करतात. शेतकरीवर्गालाच पावसाचे वेळापत्रक तोंडी पाठ असते. मृगाचा पाऊस लागणार हा भरवसा असल्यानेच रोहिणी नक्षत्रावर पेरणी होते. तरणा (पुष्य), म्हातारा (पुनर्वसू) ही मुसळधार पावसाची खात्रीची नक्षत्रे, गौरी, गणपतीतील रिमझिम तर कधी ऊन पाऊस, दसऱ्याच्या मूहूर्तावरील पावसाचे थेंब पडणे, चैत्र यात्रेदरम्यान काळवंडून येणारे आभाळ आणि विजांच्या काडकडासह पडणारा पाऊस हे वषानुवर्षाच पावसाच गणित माहिती असलेल्या शेतकऱ्याला दसऱ्याच्या वातीत पाऊस सापडावा असेच वाटते. हाच शेतकरी किंवा खेडयात राहणार कोणी शेजारधर्म, गावधर्म सांभाळत पाहुण्यांचा ऋणानुबंध–वृध्दिंगत करीत असतो. एकमेकांच्या अडीअडचणी मदत करणे. सुखदुःखात सामील होणे ही खेडयाची संस्कृती असते. तो एकटा एकटा राहू शकत नाही. आपल्यात पिकणार पसाभर तरी तो दारात येणाऱ्या याचकाच्या पदरी घालत असतो. तो त्याला रिकाम्या हातानं परत पाठवत नाही.गरजूला मदत करण्यातूनच ज्याच्याकडे दुभत जनावर नाही पण मनुष्यबळ आहे त्यांना आपल्यातल्या खंडीभर जनावरातल एखाद दुसर जनावर 'अर्धलीन' देत असतो.

एकत्र कुटुंब असो वा विभक्त कुटुंब ग्रामजीवनात आजही कोणत्याही छोटया–मोठया समारंभात 'भावकीला– मान असतो आणि भावकी म्हणून त्यांची जबाबदारीही असते. त्यात जवळची भावकी त्याला 'बुडका' असेही म्हणतात. लांबची भावकी, नातलग, पै–पाहूणे हे सर्व जण एखादा कार्यक्रम उत्साहाने पार पाडतात. लग्नाच्या कार्यक्रमाची लगबग तर लग्न ठरल्यादिवसापासून सरु असते. लग्नातील प्रत्येक तयारीसाठी स्वतःची कामे बाजूला सारुन भावकी, पै–पाहूणे राबत असतात. मुलीच्या लग्नात तिच्या चुलत्यांवर त्या लग्नघरचा भार हलका करण्याची जबाबदारी असते. थोरल्या चुलत्याचा मान लग्नात 'धार' घालण्याचा असतो तो त्याच्या ऐपतीप्रमाणे स्विकारतो.

**कृष्णात खोत त्यांच्या कादंबऱ्यातील म्हणी व वाक्प्रचार –**

खेडयातील लोकांच्या बोलण्यात म्हणी व वाक्प्रचारांचा आवर्जुन उल्लेख असतो. कमीत कमी शब्दातून अधिकाधिक अर्थ अभिव्यत करणे हे म्हणीतून घडते तर विशिष्ट भावना वेगळया शब्दातून व्यक्त करणे हे वाक्प्रचाराचे काम असते. ना.गो. कालेलकर 'भाषा आणि संस्कृती' या ग्रंथात म्हणतात. ''म्हणी, वाक्प्रचार यासारख्या अवशेषातून समाजाच्या विशिष्ट अनुभवाचे दर्शन होते.''[3] म्हणी व वाक्प्रचार हे अनुंभवाचे सार असते.

**म्हणी व त्याचे अर्थासह विश्लेषण :**

1) आलुबाचा माळ कोलुबाला : एखादयाची हक्काची गोष्ट दुसऱ्याला मिळणे.

2 आडानढिंगी नि बिनटांगी : अशिक्षितपणे, अविचाराने वागणे.

3 खाल मान्या नि गाव तान्या

4 खाली मुंडी नि पाताळ धुंडी या दोन्ही म्हणी एकाच अर्थाच्या असून अस्तित्वहीन असताना कर्तृत्व दाखविणे किंवा अपेक्षा नसताना एखादी गोष्ट करणे असा त्यांचा अर्थ होतो.

5 गाव बोलवीला नि तराळ इचारीना : कुणीही किमत न देणे

6 गाडीचा माग पेसाटीन तरी मोडाय पायजे : मोठे नुकसान छोटया भरपाईतून भरुन काढण्याची गरज. या म्हणीतील 'पेसाटी' या शब्दाचा कृषी परंपरेतील आहे. शेतात पाभरीने धान्य पेरल्यानंतर ते मुजण्यासाठी कोटेरी झुडुपापासून तयार केलेली वस्तू म्हणजे पेसाटी फिरवली जाते.

7 गावात न्हाई खण नि शिवारात न्हाई फण

8 गावात न्हाई घर नि शतात न्हाई श्यात या दोन्ही म्हणींचा अर्थ कुठेही अस्तित्व नसणे हा होतो. 'खण' म्हणजे विशिष्ट मापाची जागा तर 'फण' म्हणजे पाभरीचा फण. एक फण पेरता येईल एवढी शेतजमीन.

9 गुळमाट सोदी नि गावच्या मदी

10 सादल्या फळीचा नि मदल्या आळीचा या दोन्ही म्हणींचा अर्थ एकच असून 'स्वतचा फायदा करुन घेणारा' हा अर्थ आहे. 'गावच्या मदी', 'मधल्या आळीचा' म्हणजे गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी, संरक्षित ठिकाणी राहणारा असा अर्थ आहे.

11 जिता नाही गोडी नि मेल्यावर बंधन तोडी : जिवंतपणी गोड बोलण कधी नसते पण मेल्यावर रडता रडता कौतुक करणे. म्हणजे गरज असताना पाठ फिरवणे असाही अर्थ घेतला जातो.

12 जिकड वांझ जिकडं सांज :जिथ न्यूनत्व तिथ अपयश

13 तुला बी न्हाई मलाबी नई घाल कुत्र्याला : दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा फायदा करुन देणे.

14 दाणा तसा खाणा : जशी ऐपत तसे वागणे.

15 बसाय बसणं नि सारं असणं : वरवर दिखावूपणा पण प्रत्यक्ष काही नसणे.

16 बामणाची जत्रा नि कारभारी सत्रा : दुसऱ्यांच्या गोष्टी मध्ये हस्तक्षेप करणे.

17 माळ काय नि तुंबणारी नाळ काय : दोन्हीही गोष्टी समान असणे. यातील 'माळ' या शब्दाचा अर्थनिकृष्ट प्रतिची जमीन आणि नाळ (नाला) म्हणजे पाणी साचून राहणारी जमीन दोन्हीही ठिकाणी चांगले पीक येत नाही.

18 मुतानं हुगळायची नि चांदण्यानं वाळायची जमीन : निकृष्ट प्रतीची जमीन असा या म्हणीचा अर्थ होतो.

19 माप उठतील नि कोनात बसतील : आंगतुकपणे येऊन एखादया गोष्टीवर हक्क सांगणे.

20 रिनपन फिटल खर इनपत फिटत न्हाई : व्यवहार संपतो पण नाती उरतात. यातील 'रिन' (ऋण) म्हणजे कर्ज तर इन (विहीण) एक नाते, विहिणपणा असा अर्थ आहे.

21 सांगायला मळा खरं गेलती कळा : नाव मोठे परंतु लक्षण खोटे या अर्थाची ही म्हण आहे.

**वाक्प्रचार :**

1. उजम खाणे : विश्रांती घेणे, दम खाणे.
2. करंगळीवर न मुतणे : वेळप्रसंगी कुणाच्याही उपयोगी न पडणे.
3. खडकासंग धडका देणे : अशक्य गोष्ट प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे, खूप कष्ट घेणे.
4. गम पडणे : चैन पडणे, शांती लाभणे.
5. जीव कूक दम्याला येणे : प्रचंड कष्ट पडणे.
6. डुक धरणे : सूडबुध्दिणे वागणे.
7. ताकाला तूर लावणे : अंदाज येवू न देणे.
8. तेगार करणे : कौतुक करणे, फुशारकी मारणे.
9. दवास्न्या तोडणे : बैचेन होणे.
10. दोन्ही दरडावर हात ठेवणे : एखादयाच्या वाटयाला न जाणे.
11. मिंध असणे : उपकाराच्या ओझ्याखाली असणे.
12. रेडयाव पाऊस पडणे : एखादे काम संथगतीने करणे.
13. हत्तीसंग दांडू खेळणे : एखादी आवाक्याबाहेरची गोष्ट करणे.

या वाक्प्रचारातून करंगळी, जीव, गम, दवास्न्या, तेगार, उमज, मिंध अशा शारीरिक आणि मानसिक बाबीबरोबरच रेडा, हत्ती या प्राण्यांचा उल्लेख तर खडक, दरड, अशा निर्जीव वस्तूंचाही उल्लेख येतो.

**समारोप :**

कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील बोलीचा अभ्यास करताना असे जाणवते की बोली ही व्यक्तिभाषकांचा समूह असून बोलीमुळे अनुभव परिणामकारकपणे प्रकट होतो. बोलीतून खेडयातील संस्कृती कळते. कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील बोलीभाषेतील शब्द कृषीपरंपरा, स्वयंपाकघर, समाजव्यवहार, मानवीभावभावना यांच्याशी संबंधित आहेत. वाक्यव्यवस्थेतील विशिष्ट शब्दातून ग्रामसंस्कृतीची ओळख होते. त्याचबरोबर कमीतकमी शब्दातून अधिकाधिक अर्थ व्यक्त करणे हे म्हणींचे आणि विशिष्ट

 ISBN No. 978-81-926341-6-6

4 खाली मुंडी नि पाताळ धुंडी या दोन्ही म्हणी एकाच अर्थाच्या असून अस्तित्वहीन असताना कर्तृत्व दाखविणे किंवा अपेक्षा नसताना एखादी गोष्ट करणे असा त्यांचा अर्थ होतो.

5 गाव बोलवीला नि तराळ इचारीना : कुणीही किमत न देणे

6 गाडीचा माग पेसाटीन तरी मोडाय पायजे : मोठे नुकसान छोटया भरपाईतून भरुन काढण्याची गरज. या म्हणीतील 'पेसाटी' या शब्दाचा कृषी परंपरेतील आहे. शेतात पाभरीने धान्य पेरल्यानंतर ते मुजण्यासाठी कोटेरी झुडुपापासून तयार केलेली वस्तू म्हणजे पेसाटी फिरवली जाते.

7 गावात न्हाई खण नि शिवारात न्हाई फण

8 गावात न्हाई घर नि शतात न्हाई श्यात या दोन्ही म्हणींचा अर्थ कुठेही अस्तित्व नसणे हा होतो. 'खण' म्हणजे विशिष्ट मापाची जागा तर 'फण' म्हणजे पाभरीचा फण. एक फण पेरता येईल एवढी शेतजमीन.

9 गुळमाट सोदी नि गावच्या मदी

10 सादल्या फळीचा नि मदल्या आळीचा या दोन्ही म्हणींचा अर्थ एकच असून 'स्वतःचा फायदा करुन घेणारा' हा अर्थ आहे. 'गावच्या मदी', 'मधल्या आळीचा' म्हणजे गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी, संरक्षित ठिकाणी राहणारा असा अर्थ आहे.

11 जिता नाही गोडी नि मेल्यावर बंधन तोडी : जिवंतपणी गोड बोलण कधी नसते पण मेल्यावर रडता रडता कौतुक करणे. म्हणजे गरज असताना पाठ फिरवणे असाही अर्थ घेतला जातो.

12 जिकड वांझ जिकडं सांज :जिथ न्यूनत्व तिथ अपयश

13 तुला बी न्हाई मलाबी नई घाल कुत्र्याला : दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा फायदा करुन देणे.

14 दाणा तसा खाणा : जशी ऐपत तसे वागणे.

15 बसाय बसणं नि सारं असणं : वरवर दिखावूपणा पण प्रत्यक्ष काही नसणे.

16 बामणाची जत्रा नि कारभारी सत्रा : दुसऱ्यांच्या गोष्टी मध्ये हस्तक्षेप करणे.

17 माळ काय नि तुंबणारी नाळ काय : दोन्हीही गोष्टी समान असणे. यातील 'माळ' या शब्दाचा अर्थनिकृष्ट प्रतिची जमीन आणि नाळ (नाला) म्हणजे पाणी साचून राहणारी जमीन दोन्हीही ठिकाणी चांगले पीक येत नाही.

18 मुतानं हुगळायची नि चांदण्यानं वाळायची जमीन : निकृष्ट प्रतीची जमीन असा या म्हणीचा अर्थ होतो.

19 माप उठतील नि कोनात बसतील : आंगतुकपणे येऊन एखादया गोष्टीवर हक्क सांगणे.

20 रिनपन फिटल खर इनपत फिटत न्हाई : व्यवहार संपतो पण नाती उरतात. यातील 'रिन' (ऋण) म्हणजे कर्ज तर इन (विहीण) एक नाते, विहिणपणा असा अर्थ आहे.

21 सांगायला मळा खरं गेलती कळा : नाव मोठे परंतु लक्षण खोटे या अर्थाची ही म्हण आहे.

**वाक्प्रचार :**

1 उजम खाणे : विश्रांती घेणे, दम खाणे.
2 करंगळीवर न मुतणे : वेळप्रसंगी कुणाच्याही उपयोगी न पडणे.
3 खडकासंग धडका देणे : अशक्य गोष्ट प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे, खूप कष्ट घेणे.
4 गम पडणे : चैन पडणे, शांती लाभणे.
5 जीव कूक दम्याला येणे : प्रचंड कष्ट पडणे.
6 डुक धरणे : सूडबुध्दिणे वागणे.
7 ताकाला तूर लावणे : अंदाज येवू न देणे.
8 तेगार करणे : कौतुक करणे, फुशारकी मारणे.
9 दवास्न्या तोडणे : बैचेन होणे.
10 दोन्ही दरडावर हात ठेवणे : एखादयाच्या वाटयाला न जाणे.
11 मिंध असणे : उपकाराच्या ओझ्याखाली असणे.
12 रेडयाव पाऊस पडणे : एखादे काम संथगतीने करणे.
13 हत्तीसंग दांडू खेळणे : एखादी आवाक्याबाहेरची गोष्ट करणे.

या वाक्प्रचारातून करंगळी, जीव, गम, दवास्न्या, तेगार, उमज, मिंध अशा शारीरिक आणि मानसिक बाबीबरोबरच रेडा, हत्ती या प्राण्यांचा उल्लेख तर खडक, दरड, अशा निर्जीव वस्तूंचाही उल्लेख येतो.

**समारोप :**

कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील बोलीचा अभ्यास करताना असे जाणवते की बोली ही व्यक्तिभाषकांचा समूह असून बोलीमुळे अनुभव परिणामकारकपणे प्रकट होतो. बोलीतून खेडयातील संस्कृती कळते. कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील बोलीभाषेतील शब्द कृषीपरंपरा, स्वयंपाकघर, समाजव्यवहार, मानवीभावभावना यांच्याशी संबंधित आहेत. वाक्यव्यवस्थेतील विशिष्ट शब्दातून ग्रामसंस्कृतीची ओळख होते. त्याचबरोबर कमीतकमी शब्दातून अधिकाधिक अर्थ व्यक्त करणे हे म्हणींचे आणि विशिष्ट

भावना व्यक्त करणे हे वाक्प्रचारांचे कार्य असते. एकाच अर्थाच्या पण वेगवेगळया संदर्भाने आलेल्या म्हणी आढळतात. कृष्णात खोत यांच्या कादंबऱ्यातील भाषेतुन ग्रामीण शब्दकोश समृध्द होतो तसेच वर्तमान काळातील बोलीचे आस्तित्व ध्यानात येते. वाक्प्रचारातून शारीरिक अवयव, प्राणी, निर्जीव वस्तू,स्वयंपाक घरातील वस्तू, मानवी भावना, यांचा उल्लेख येतो. थोडक्यात, कृष्णात खोत यांचे समाजभान, सूक्ष्मनिरीक्षण, ग्रामसंस्कृती जपण्याची आस, कृषी परंपरेकडे आदराने पाहण्याची संवेदना या गोष्टी त्यांच्या कादंबऱ्यातील बोलीचा अभ्यास करताना जाणवतात.

## संदर्भ सूची :


1. माडगूळकर–चिटणीस विजया–'आधुनिक भाषा विज्ञान, प्रतिमा प्रकाशन, पुणे 1999, पृ. 197,
2. मुलाटे वासुदेव –ग्रामीण कथाः स्वरुप आणि विकास, स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, 2012, पृ. 288
3. कालेलकर ना. गो.–'भाषा आणि संस्कृती', मौज प्रकाशन, मुंबई 1962
4. खोत कृष्णात–'गावठाण', मौज प्रकाशन, मुंबई 2001
5. खोत कृष्णात–'रौंदाळा' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 2008
6. खोत कृष्णात–'झडझिंबड'पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 2012
7. खोत कृष्णात–'धूळमाती'मौज प्रकाशन, मुंबई 2014